स.दि.दावा.क्र. २/२०२५
एसबीआय वि. श्रीमती किरण
निशाणी क्र. ८ क्रमश :

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास वादीचे वकिल श्री.जे.डब्ल्यु.गावंडे यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

**०७.** मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

**०८.** दाव्यासोबत मी राशी उदार हेतु आवेदन पत्र सादर केलेले आहे. ते अधिक्षका मार्फत सत्यापीत करण्यात आलेले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ९** देण्यात येते. दाव्यासोबत मी सातबारा व आठ अ ही कागदे सादर केलेली आहेत. त्यांना अनुक्रमे **निशाणी १० व ११** देण्यात येते. लीन मार्कींग आर्थरायजेशन लेटर दिनांक २५.०३.२०२१९ सादर केलेले आहे. त्यास **निशाणी १२** देण्यात येते. प्रतिवादीचा इंटरव्हयु फॉर्म जोडलेला आहे. त्यास **निशाणी १३** देण्यात येते. आणखी एक इंटरव्हयु फॉर्म दाखल केला आहे. त्यास **निशाणी १४** देण्यात येते. प्री सॅक्शन इंन्सपेक्शन रिपोर्ट सादर केलेला आहे. त्यास **निशाणी १५** देण्यात येते. स्टॅम्प पेपरच्या सहा प्रति सादर केल्या आहे. त्यांना एकत्रितरित्या **निशाणी १६** देण्यात येते. कोटेशनची प्रत सादर केलेली आहे. त्यास **निशाणी १७** देण्यात येते. आणखी एक लिन ॲग्रीमेंट सादर केले आहे. त्यास **निशाणी १८** देण्यात येते. कर्ज फॉर्मची प्रत सादर केलेली आहे. त्यास **निशाणी १९** देण्यात येते. लेटर ऑफ अरेंजमेंटची प्रत सादर केली आहे. त्यास **निशाणी २०** देण्यात येते. हायपोथीकेशन ॲग्रीमेंटची प्रत सादर केलेली आहे. त्यास **निशाणी २१** देण्यात येते. लोन अकाउंट स्टेंटमेंटची प्रत सादर केलेली आहे. त्यास **निशाणी २२** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी विरूध्द प्रकरण एकतर्फा असल्यामुळे उलटतपास काही नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—
( शिवनाथ एम. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**

दि. ०३.०२.२०२६.